REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | DECEMBER - 2021

# "दहशतवाद आणि मेडिया:-निशाण्यावर सुरक्षा आणि न्याय तंत्र"

**Prof.Dr.N.Z.Patil**
**Research Guide & HOD In Defence and Strategic Studies,**
**K.N.B.Art's College Navalnagar,Tal & Dist-Dhule(Maharashtra)**



## प्रस्तावना:-

दहशतवादाच्या विरोधात लढाई करताना आपल्या डोक्यात किंतु-परंतु सारखे शब्द असायला नकोत, त्यामुळे दहशतवादाच्या विरुद्ध ची लढाई ही कमकुवत होईल. दहशतवाद्यांच्या या खूनी खेळाला सहज घेणे हि एक योग्य गोष्ट होणार नाही. असेच जर आपण केलं तर ते आज नाही तर येणाऱ्या पिढीसाठी सुद्धा अनेक प्रश्न निर्माण करणारी ती एक गोष्ट ठरेल. अशा या दहशतवादाला सामाजिक, आर्थिक,नैतिक,वैचारिक, राजनीतिक अशा कोणत्याही आधारावर योग्य ठरवणे किंवा तसा प्रयत्न करणे ही एक सगळ्यात वाईट गोष्ट आहे.

लोकशाहीवादी देशांमध्ये जनतेच्या विचारांना आकार देण्यात मीडियाचा फार मोठा सहभाग असतो. अनेक वर्षांपासून दहशतवादाच्या बळी पडणाऱ्या भारतासारख्या देशात तर ही भूमिका फारच महत्त्वाची ठरते. दहशतवादा सारख्या घटनांवर ज्यावेळेस रिपोर्टिंग केली जाते. तर त्यावेळेला जास्तीत जास्त सावधानता बाळगणे गरजेचे आहे. परंतु मागच्या काही वर्षापासून अशा काही गोष्टी समोर आल्या आहेत की ज्यामध्ये मीडियाचा एक वर्ग दहशतवाद्यांच्या बाजूने त्यांचे सरळ सरळ समर्थन करतांना दिसून येत आहे. एकीकडे दहशतवाद्यांच्या बाजूने सहानुभूती प्राप्त करण्याचा अनेक लोक प्रयत्न करताना दिसतात. त्यामुळे दुसरीकडे असेही दिसून येते की बरेच लोक जे आपले सुरक्षा बल रात्रंदिवस देशाच्या सेवेसाठी तत्पर असतात अनेक संकटांचा सामना करत असतात अशा राष्ट्रासाठी रात्रंदिवस आपली आहुती देणाऱ्या या देशाच्या शूरवीरांन बद्दल सुद्धा बऱ्याचदा शंका निर्माण करताना दिसतात. त्यामुळे अशा या देशाच्या सुरक्षा दलांचे निश्चितच मनोधैर्यावर परिणाम होताना दिसतो. म्हणून अशा गोष्टी राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून देशात घडू नयेत,परंतु दुर्दैवाने आपल्या देशात घडताना दिसतात.

सदरच्या संशोधन पत्रात अशाच काही गोष्टी आहेत की,त्यांची चौकशी करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. त्यात 1993 मध्ये मुंबईत झालेला बॉम्ब ब्लास्ट असो व त्या संबंधित याकूब मेमन ची झालेली फाशी असो, दुसरा मुद्दा असा आहे की, 2008 मध्ये दिल्लीतील बाटला हाऊस एन्काउंटर मध्ये आलेला हा एक मुद्दा आहे, वर्ष 2004 मध्ये लष्कर-ए-तोयबा च्या संदिग्ध दहशतवादी इशरत जहा आणि तिच्या तीन साथीदारांचा आमदाबाद मध्ये जो एन्काउंटर झाला त्याबाबत या संशोधन पत्रामध्ये विचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**१) याकूब मेमन याची फाशी( 2015)**

2015 मध्ये मुंबई बॉम्ब स्पोट घडवून आणले होते या बॉम्बस्फोटाच्या माध्यमातून जवळ जवळ 257 लोकांची हत्या करण्यात आली, आणि त्यात त्याचा चा मुख्य सूत्रधार याकूब मेमन याला शिक्षा देण्यासाठी भारतीय न्यायव्यवस्थेला जवळ जवळ बावीस वर्ष लागले. एवढ्या लांब कालावधीपर्यंत न्यायाची वाट पाहणे म्हणजे पिडीत लोकांवर अन्याय करण्यासारखे आहे. परंतु शेवटी अनेक वाद विवादा नंतर या घटनेत पीडितांना उशिरा का होईना न्याय मिळाला. या केस मध्ये सर्वात महत्त्वपूर्ण आणि अचंबित करणारी गोष्ट ही आहे की, या गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या याकूब मेमन ला वाचवण्यासाठी भारतातील मीडियाने खूप मोठी मोहीम चालवली ही फार मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. शेवटी 30 एप्रिल 2015 रोजी महाराष्ट्र सरकारने याकूब मेमन ला फाशी देण्याबाबतची आधिसुचना काढली आणि 30 जुलै 2015 रोजी त्याला फाशी दिली गेली जसजसे हे फाशीचे दिवस त्याचे जवळ येत होते तशी तशी त्याला वाचणाऱ्यांची संख्या वाढत होती आणि त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे तर्क कुतर्क लोकांकडून दिले जाऊ लागले होते. या केस मध्ये मीडियाच्या काही वाहिन्यांनी सुद्धा खूप महत्त्वपूर्ण भूमिका निभावलेली आपल्याला दिसून येते.

१)" द हिंदू" नावाच्या वृत्तपत्रातून 24 जुलै 2015 रोजी रंगराजन यांचा एक लेख प्रकाशित केलागेला होता. त्याचे शीर्षक होते,justice or Avenjence त्याला मराठीत ( न्यायाचा प्रतिशोध) असे म्हटले जाते. या लेख मध्ये रंगराजन यांनी अनेक तर्क देऊन असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता की, याकूब मेमन बरोबर कोर्टाने न्याय केला नाही. एवढेच नाही तर त्याचा बदला घेतला जात आहे, असे भासवण्याचा प्रयत्न केला गेला. त्याने असाही दावा केला की या खूप मोठ्या केस मध्ये अनेक घटनात्मक गोष्टींचे पालन केले गेले नाही. त्याला निरपराध सिद्ध करण्याचा एक केविलवाणा प्रयत्न या लेखकाकडून केला गेलेला आपल्याला दिसून येतो.

२) दुसरी घटना अशी की 26 जुलै 2015 रोजी" द टाइम्स ऑफ इंडिया" या वर्तमानपत्रात माजी "रॉ "अधिकारी यांनी लिहिलेल्या एका लेखाचा त्या ठिकाणी आधार घेतला गेला आणि याकूब मेमन ला फाशी देऊ नये याबाबत एक बातमी छापली गेली. या बातमीचे शीर्षक असे होते कि,ते म्हणजे (आम्ही याकूब तूला असे वचन दिले आहे कि,आम्ही तुला फाशी होऊ देणार नाहीत.) महत्त्वपूर्ण गोष्ट ही आहे की, बी रमन यांनी जिवंत असेपर्यंत हा लेख कधीही लिहिलेला नव्हता त्यामुळे या लेखा बाबत ची संदिग्धता आहे, किंवा हा लेख पूर्णपणे बनावट असल्याचे दिसून येते. म्हणजे सांगायचे तात्पर्य असे कि याकुब मेमन सारख्या देशद्रोह्याला वाचवण्यासाठी अनेक लोक मोठ्या लोकांचे कोटिंग देतात आणि अशा नराधमांना वाचवण्याचा प्रयत्न करतात ,ही भारतीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून फार मोठी चिंतेची गोष्ट आहे आहे.

३) 26 जुलै 2015 रोजी"द टाइम्स ऑफ इंडिया" मध्ये एक बातमी छापली गेली आणि त्या बातमीचे शीर्षक असे होते की, We are part of one family India वास्तविक 26 नोव्हेंबर 2013 रोजी IGNOU मार्फत एक कैद्यांच्या बाबत निबंध स्पर्धेचे आयोजन केले गेले होते या कैद्यांमध्ये याकुब मेमन ने देखील एक निबंध लिहिला होता आणि त्या निबंधातील मथळा जसाच्या तसा या लेखामध्ये छापण्यात आला होता. हा लेख वाचताना लोकांना असे वाटत होते की याकूब मेमन हा एक खरा आणि धर्मनिरपेक्ष भारतीय होता. भारतीय घटना आणि कायदे यांच्याबाबत त्याची अतूट अशी श्रद्धा होती यासारख्या गोष्टींचा उल्लेख या लेखांमध्ये केला गेला होता आणि हा लेख सुप्रीम कोर्टा मार्फत याकूब मेमन ला फाशीची शिक्षा सुनावलेल्या गेल्यानंतर लिहिण्यात आला होता. यात एक गोष्ट स्पष्ट दिसून येते की,हे सगळं शढयंत्र या ग्रुपच्या लोकांकडूनच पूर्वनियोजित पणे घडवून आणले गेले होते.

४) याठिकाणी एक चौथी गोष्ट सांगण्यासारखी आहे आणि ती अशी Hollywood मधील एका मोठया कलाकर सलमान खान याने याकूब मेमन च्या बाजूने ट्विटर वर याकूब मेमन कसा चांगला व्यक्ती आहे, या बाबत त्याने ट्विट केले होते.सलमान खानने लिहिले होते की, एक निरपराध व्यक्तीची हत्या ही मानवतेची हत्या आहे. वाघाला आणून त्याला फासावर लावा नुसतं दाखवण्यासाठी त्याच्या भावाला फाशी देऊ नका हे लिहिताना सलमान खानला हेही माहिती होते की, आपण सेलिब्रिटी आहोत आणि आपल्या बोलण्याच्या लोकांवर परिणाम होतो. परंतु ज्या वेळेस सर्वत्र सलमान खान वर टीका होऊ लागली, त्यावेळेस त्याने मात्र आपले हे सगळे ट्विट डिलिट केले आणि माफी देखील मागितली.

५) याच काळात वेगवेगळ्या प्रकारच्या न्युज चॅनल वरती याकूब मेमन च्या फासी संबंधात वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम दाखवले जात होते. या टीव्हीवरील दाखवल्या जाणाऱ्या सर्व चर्चा मध्ये जास्तीत जास्त मुस्लिम प्रतिनिधी सामील असलेले आपल्याला दिसतात. आणि त्यातल्या त्यात ते हैदराबाद आणि मुंबई या शहरांशी संबंधित असलेले दिसले आणि ते वारंवार हे सांगण्याची धडपड करत होते की याकूब मेमन च्या फाशी च्या माध्यमाने एका धार्मिक विशेष समुदायाला संपवण्याचा प्रयत्न केला जात आहे. दैनिक जागरण च्या 27 जुलै 2015 च्या लेखा मध्ये स्वप्न दास गुप्ता यांनी असे लिहिले होते की सांगण्याची गोष्ट नाही की राजकीय स्वार्थासाठी मुद्दाम आधारहीन आरोप लावून भारताच्या न्यायव्यवस्थेला कलंकित करण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे. आणि त्यात भारतीय मिडीयाचा सुद्धा मोठा सहभाग आहे असे भासवण्याचा प्रयत्न केला गेला.

६) ३० जुलै च्या "द हिंदू" या वर्तमानपत्रात याकूब मेमन च्या फाशीला विरोध करणाऱ्या पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल गोपालकृष्ण गांधी यांनी राष्ट्रपतींना एक पत्र लिहिले आणि त्या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले होते की,मेमन ला फाशी माफ देण्याबाबत अपील केले होते. या पत्रात गोपाल कृष्ण गांधी यांनी याकूब मेमन च्या समर्थनार्थ वेगवेगळे तर्क प्रस्तूत केले होते. द हिंदू या वर्तमानपत्रात याकूब मेमन च्या फाशी ला अनुसरून एक ऑनलाईन डिबेट देखील आयोजित केला गेलेला होता. त्याचे शीर्षक होते "मानवता या प्रतिशोध" या शीर्षकाखाली लोकांनी याकूब मेमन च्या फाशीच्या विरोधात विचारांना जास्त महत्त्व दिले गेलेले दिसून येते.

७) "द हिंदू" या वर्तमानपत्राने 30 जुलै रोजी एक लेख छापला आणि त्या लेखाचे शीर्षक होते की,"मानवीय आणि विवेकपूर्ण" या शीर्षकाखाली संपादकीय लेख लिहिला गेला त्या लेखात याकूब मेमन च्या फाशीच्या विरोधात अनेक प्रकारचे तर्क प्रस्तुत केले गेले त्याचप्रमाणे या लेखांमध्ये अफजल गुरू याला दिल्या गेलेल्या फाशी यासंदर्भात एक हत्या अशी उपाधी दिली गेली..

८) याकूब मेमन या देशद्रोह्याला फाशी देण्याच्या आधीच अनेक टीव्ही चॅनल्स वरती वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा घडवून आणल्या गेल्या 30 जुलै 2015 रोजी ज्या दिवशी त्याला दफन केले गेले त्याच दिवशी मिसाईल मॅन च्या नावाने प्रसिद्ध असलेले भारताचे पूर्व राष्ट्रपती ए.पी..जे.अब्दुल कलाम यांचादेखील अंतिम संस्कार केला जात होता कलामांच्या संदर्भातील अनेक बातम्या काहीवेळ दाखवल्या गेल्या परंतु आपल्या नकारात्मक भूमिकेत असलेल्या भारतीय मिडियाने जास्तीत जास्त बातम्या कलामांच्या दाखवण्याऐवजी याकूब मेमन च्या बाबतीतच दाखवण्याला धन्यता मानलेली आपल्याला दिसते.

९) 31 जुलै रोजी वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी आणि त्या पक्षांच्या प्रभावशाली नेत्यांनी आपले विरोध आपले याकूब मेमन च्या विरोधातील जे वक्तव्य होते ते वक्तव्य दाखवण्यातच प्रसारमाध्यमनी आपली धन्यता मानली या

कार्यक्रमांमध्ये दोन पक्षाचे काही नेते जास्त चर्चेत राहिले त्यात याकुबच्या या फाशीच्या संदर्भामध्ये सरकाराने आणि न्यायालयाने घाई केली असे दाखवण्याचा प्रयत्न केला.

१०)पाच ऑगस्ट 2015 रोजी "द हिंदू" या वर्तमानपत्राने आपल्या संपादकीय पेजवर सुप्रीम कोर्टाचे वकील संजय हेगडे यांचा एक लेख प्रकाशित केला गेला होता. त्याचे शीर्षक असे होते की, Lethal lottery or just या लेखात हेगडे यांनी याकूब मेमन च्या फाशी बाबत अप्रत्यक्षपणे अनेक प्रश्न निर्माण केले होते.

११) नेहमीच ब्रेकिंग न्यूज च्या शोधात असलेल्या इलेक्ट्रॉनिक मीडियाने आपल्या पूर्ण हद्दी ओलांडल्या होत्या जेव्हा याकूब च्या फाशी संबंधात दाऊद यांच्या एका साथीदाराने तो म्हणजे छोटा शकील याने याकूब मेमन च्या बाबतीत जे म्हटले होते त्या गोष्टीला सर्वत्र प्रकर्षाने दाखवले गेले अर्थात एक पळून गेलेला देशद्रोही कैदी दुसऱ्या देशद्रोह्या बद्दल दुसरं काय बोलू शकेल परंतु भारतीय मीडिया इतका विकल होऊन गेलेला आहे की, तो आपला टीआरपी वाढवण्यासाठी कोणत्याही स्तराला जाऊ लागलेला आहे आणि ही चांगल्या लोकशाही व्यवस्थेसाठी एक धोक्याची घंटा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

12)याकूब मेमन च्या फाशी संदर्भात इलेक्ट्रॉनिक मीडियाने ज्या काही बातम्या पसरवल्या त्या अतिशय गैर जबाबदार अशा स्वरूपाच्या होत्या आणि म्हणून भारताच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने त्या बातम्यांची दखल घेतली आणि त्या नुसार मंत्रालयाने एबीपी न्यूज एनडीटीव्ही आणि आज तक या सर्व चॅनल्सना नोटिसा जारी केल्या परंतु नंतर या मीडियाच्या एडिटर गटाने या गोष्टीवर आपली हरकत नोंदवली आणि त्यानंतर सरकारने मात्र या नोटिसा वापस घेतलेल्या दिसतात.

13) अशा पद्धतीने आपण पाहिलं असेल प्रयोग त्याच्या अनेक गोष्टींचा प्रसार केला गेला त्यातून लोकांमध्ये हा संदेश गेला पाहिजे की, याकूब मेमन याची फाशी देऊन सरकारने त्याच्या वर अन्याय केलेला आहे. न्यायचा गळा घोटला गेलेला आहे. तसेच तो मुसलमान असल्यामुळे याकूब ला फाशी दिली जात आहे. अशा प्रकारच्या बातम्या त्याचप्रमाणे तो निरपराध आहे. एवढेच नाही तर सुरक्षा एजन्सी ने देखील याकूब मेमन बरोबर धोका केलेला आहे. वगैरे वगैरे अशा अनेक प्रकारच्या बातम्या इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून सर्वत्र पसरवण्यात आल्या यात कोणालाही शंका नाही की, या सगळ्या गोष्टी एका नियोजित पद्धतीने लावल्या गेल्या या सर्व गोष्टींचा मुख्य उद्देश हा होता की,जनतेच्या मनात याकूब मेमन च्या संदर्भात सहानुभूती निर्माण करणे शेवटी या गोष्टीतून महाराष्ट्रातील एका पार्टीच्या व्यक्तीचा उपाध्यक्ष ने याकूब मेमन च्या बायकोला आपल्या पार्टीचा राज्यसभा उमेदवार बनवून तिला राज्यसभेमध्ये पाठवण्यासाठी प्रयत्न केला गेला. नंतर या पार्टी वर खूप मोठी टीका झाली आणि नंतर पार्टीने त्या उपाध्यक्ष वर कारवाई करून त्याला पार्टीतून काढून टाकण्यात आले परंतु याठिकाणी प्रश्न हा निर्माण होतो की, अशा प्रकारच्या गोष्टी लोकांच्या मनामध्ये कसे काय येतात, हि या ठिकाणी विचार करण्यासारखी गोष्ट आहे.शेवटी अशा प्रकारच्या गोष्टी करणे म्हणजेच मीडियाकडून जे अभियान याकूब मेमन च्या बाजूने चालवले गेले त्या गोष्टीचा परिणाम असलेला आपल्याला दिसून येतो काही लोक दहशतवादी लोकांना नायक ठरवण्याच्या हव्यासापोटी अशा प्रकारच्या गोष्टी करतात त्याच प्रकारे सुरक्षा एजन्सी तसेच भारताच्या न्यायपालिकेवर सुद्धा काही लोक प्रश्नचिन्ह निर्माण करताना आपल्याला दिसतात परंतु खरे पाहिले तर सुरक्षा एजन्सी ने आणि भारताच्या यंत्रणेने या गोष्टीला पूर्णपणे आपल्या जबाबदारीने या गोष्टीचा शेवट केलेला आपल्याला दिसून येतो.

## मार्च 2013 आणि जुलै 2015 या काळात चाललेली कायदेशीर कारवाई:-

ही गोष्ट भारताच्या उच्च न्यायालयाच्या विश्वसनीयते वर आणि संवेदनशीलतेवर विश्वास करण्यासाठी पुरेशा आहेत की, 21 मार्च 2013 रोजी जेव्हा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने याकूब मेमन याला फाशी देण्याच्या बाबतीत आपला निर्णय कायम ठेवला, त्या गोष्टीला समोर ठेवून 30 जुलै 2015 च्या सकाळ पर्यंत याकूब च्या याचिकाकर्त्यांचा ने सुप्रीम कोर्टाच्या एकूण 14 न्यायाधीशांनी विचार केला. या 14 न्यायाधिशांच्या मध्ये तीन मुख्य न्यायाधीश जस्टीस सदाशिवम, जस्टीस लोढा, जस्टीस दत्तू बी सामील होते.या आधी भारताच्या संसदीय परंपरेमध्ये असे कधीही झाले नाही की, की एखाद्या फाशीच्या संदर्भातल्या केसच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचे इतक्या न्यायाधीशांनी सुप्रीम कोर्टात सुनवाई केली असेल.

1993 मध्ये मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाच्या बाबतीतल्या विशेष टाडा कोर्टाने याकूब अब्दुल रज्जाक मेमन याला 27 जुलै 2007 रोजी दोषी ठरवले आणि फाशीची शिक्षा कायम केली. त्यानंतर या निर्णयाला याकूब मेमन याने सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. बऱ्याच काळापर्यंत चाललेल्या सुनावणी नंतर 21 मार्च 2013 रोजी सर्वोच्च न्यायालयाने याकूब मेमन यांला फाशीची शिक्षा ही कायम ठेवली. सुप्रीम कोर्ट ने हे मान्य केले की, याकुब केवळ 1993 मध्ये मुंबईत बॉम्ब स्पोटात सामिल होता एवढेच नाही,तर त्याने त्या बॉम्बस्फोटांना घडवून आणण्यासाठी टायगर मेमन आणि दाऊद इब्राहिम यांची सक्रिय मदत केलेली दिसून आले. न्यायाधीशांनी या स्पोटाच्यामागे मास्टर माईंड आणि ड्रायव्हिंग फोर्स ज्याला आपण म्हणतो त्याने हे स्पष्ट होते की, याकूब मेमन त्याने 1993 मुंबईमधील बॉम्ब स्पोटात बळी गेलेल्या 257 निरपराध लोकांची त्याने हत्या केली त्याच्यासाठी तो दोषी होता आणि या कटात जे मुख्य कट रचणारे होते, त्यातला हा एक मुख्य आरोपी होता. त्यानंतर यातून स्वतःला वाचवण्यासाठी त्याच्या मित्रपरिवाराने त्याच्याबद्दल ज्यांना ज्यांना आस्था होती त्या सर्व लोकांनी सर्व प्रकारच्या कायदेशीर विकल्पंचा उपयोग करून घेतला आणि त्यानुसार त्याला वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. याकूब मेमन ला फाशी मिळाल्यानंतर त्याने ज्या दोन याचिका रिव्ह्यू पिटीशन पुनर्विचार याचिका कोर्टात दाखल केल्या होत्या त्या दोनही याचिका कोर्टाने 30 जुलै 2013 रोजी रद्द केल्यात

. 6 ऑगस्ट 2013 रोजी याकूब मेमन चा भाऊ सुलेमान याने राष्ट्रपती कडे दये साठी अर्ज दिला होता त्या अर्जाला राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी अकरा एप्रिल 2014 रोजी रद्द केला होता.

याकूब मेमन याने सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती त्याची किंमत आहे त्याची मृत्युदंडाची शिक्षा होती त्या शिक्षेच्या संदर्भातील पुनर्विचार याचिका रिव्ह्यू पिटीशन यावर खुल्या न्यायालयात त्याने सुनवाई ची मागणी केली होती परंतु एक जून 2014 रोजी सुप्रीम कोर्टाने व त्या कोर्टातील दोन न्यायाधीशांनी त्याच्या फाशीच्या संदर्भात जे क्रियांन्वयन वर तात्पुरत्या स्वरूपात स्थगिती आणली होती त्यानंतर संविधान पीठात या याचिकेवर डिसेंबर 2014 मध्ये सुनावणी होणार होती तोपर्यंत बंदी आणली होती.

याकूब मेमन च्या फाशी संदर्भात त्याने दाखल केलेल्या पुनर्विचार याचिका वर 24 मार्च 2015 रोजी खुल्या न्यायालयात सुनावणी सुरू केली गेली. सुनवाई नंतर 9 एप्रिल 2005 सुप्रीम कोर्टाने पुनर्विचार याचिका रद्द केली.

या सर्व प्रक्रिये च्या शेवटी महाराष्ट्र सरकारने 30 एप्रिल 2015 रोजी एक अधिसूचना काढली आणि त्या अधिसूचनेनुसार याकूब मेमन ला फाशी देण्यासाठी 30 जुलै 2015 ही तारीख निश्चित केली गेली.

22 मे 2015 रोजी याकूब मेमन याने सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिंग याचिका दाखल करून स्वतःला निरपराध सिद्ध करण्यासाठी प्रयत्न केला परंतु सर्वोच्च न्यायालयाने ती याचिका देखील रद्द ठरवली.

यानंतर याकूब मेमन याने महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याकडे पुन्हा दयेची याचिका दाखल केली त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून फाशीच्या कार्यान्वयनला थांबवण्याची मागणी केली गेली.. यात खूपच त्याचा वकिलांनी असा दावा केला की, महाराष्ट्र सरकार कडून जारी केले गेलेल्या आधी सूचनेला त्यांनी अवैध ठरवण्याचा प्रयत्न केला त्यांचे म्हणणे असे होते की,याकूब मेमन चे कायदेशीर अधिकार आणि विकल्प पूर्ण होण्याच्या आधीच या प्रकारचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला असे त्यांचे म्हणणे होते.

या सर्व हालचालींच्या शेवटी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने 29 आणि 30 जुलै 2015 च्या रात्री एक अभूतपूर्व असा निर्णय घेतला रात्री दोन वाजून 30 मिनिटांनी न्यायाधीशांच्या बेंच ने याकूब मेमन कडून दाखल केल्या गेलेल्या अनेक याचिकांवर त्यांनी सुनवाई सुरू केली. संपूर्ण रात्रभर न्यायालयाची कार्यवाही सुरू राहिले शेवटी सर्व कायदेशीर डावपेच हे बेकार ठरले आणि सुप्रीम कोर्टाने याकूब मेमन च्या फाशीला स्थगिती देण्याच्या बाबतीत पूर्णपणे नकार दिला त्यानुसार 30 जुलै 2015 रोजी सकाळी 6 वाजून 30 मिनिटांनी याकूब मेमन ला त्याच्या गुन्ह्यांची सजा म्हणून त्याला फासावर लटकवले गेले.

याकूब मेमन च्या संदर्भातील या सर्व प्रक्रियेकडे पाहता असे स्पष्ट होते की, दहशतवादी कृत्यांमध्ये लिप्त असून देखील व त्या संदर्भात दोषी सिद्ध झाल्यावर देखील याकूब मेमन ला सर्व प्रकारच्या कायदेशीर सवलती पुरवल्या गेल्या अशा प्रकारच्या कायदेशीर सवलती कदाचित जगातील कोणत्याही देशामध्ये गुन्हेगाराला मिळत नसतील एवढ्या सवलती याकूब मेमन ला भारतात उपलब्ध करून दिल्या गेल्या बावीस वर्षापेक्षा जास्त काळ चाललेल्या कायदेशीर लढाईनंतर याकूब मेमन यांना फासावर लटकवले गेले त्यानंतर देखील आपल्या देशात त्याच्या फाशीवर वाद-विवाद होऊन सुरक्षा एजन्सीनवर शंका घेणे, त्यांच्या वर प्रश्न निर्माण करणे, आणि मिडीयाचा प्रोपोगंडां अभियान चा हिस्सा बनणे या गोष्टी विचार करण्यास भाग पडतात.

### 2) बाटला हाऊस एन्काऊंटर खटला (2008)

दिल्लीतील भरवस्तीत असलेल्या बाटला हाऊस तेथे ही दहशतवादी घटना घडवून आणली गेली.त्यानंतर दहशतवादाच्या विरोधात सुरक्षा बाळांची जी मोहीम सुरू होती त्या मोहिमेला कमकुवत करण्यासाठी भारता लाजिरवाणी मोहीम हाती घेतली गेली. हे भारतीय इतिहासातील एक मोठे लाजिरवाणे असे उदाहरण आहे. देशाची राजधानी मध्ये अशा प्रकारचं एन्काऊंटर रात्रीच्या अंधारात कोणत्याही प्रकारच्या भरवस्तीतच नाही, परंतु ज्या ठिकाणी प्रचंड अशी लोकसंख्या आहे ज्याला आपण दिल्लीतील जामिया नगर आणि त्याच जामिया नगर मधील एक अपार्मेंट मध्ये दिवसा घडून आणलेले हे एक दहशतवादी कृत्य होते. या दहशतवादी कृत्यात दहशतवाद्यांनी दिल्ली पोलीस दलातील एक जांबाज इनस्पेक्टर गोळ्यांचा वर्षाव करून त्याचा जीव घेतला. त्यानंतर देखील शूद्र आणि स्वार्थी प्रवृत्तीच्या राजनीतिक लोकांनी त्याच प्रमाणे आपला टीआरपीचा तवा गरम करण्याच्या मागे लागलेल्या मीडियाने देखील या एन्काऊंटर ला खोटे एन्काऊंटर ठरवण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला. या ठिकाणी स्वतःचा जीव धोक्यात घालून दहशतवाद्यांविरुद्ध कारवाईत सहभागी असलेल्या टीम मधील एका इन्स्पेक्टर वर दुसऱ्यांची हत्या करण्यासारखा एक खोटा आरोप लावला गेला वास्तविक 13 डिसेंबर 2008 रोजी दिल्लीमध्ये एकूण पाच सिरीयल ब्लास्ट झाले त्यात जवळजवळ तीस निरपराध लोक मारले गेले. त्याच प्रमाणे 100 पेक्षा जास्त लोक या कृत्यांमध्ये घायाळ झालेत.सर्व बॉम्बस्फोटा नंतर मीडियाने नंतर सुरक्षा एजन्सी तसेच गुप्तचर एजन्सी आणि सुरक्षा बल यांच्या नाकर्तेपणा बाबत ढोल वाजवायला सुरुवात केली. याच काळात 19 सप्टेंबर 2008 रोजी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेल ला सूचना मिळाली की, नुकत्याच झालेल्या बॉम्बस्फोटात जे दहशतवादी होते ते दहशतवादी एका फ्लॅटमध्ये लपलेले आहेत, अश्या इनपुट च्या

आधारावर तात्काळ ऍक्शन घेत स्पेशल सेलच्या इन्स्पेक्टर आणि एन्काऊंटर स्पेशालिस्ट मोहनचंद शर्मा यांनी आपले सहा सोबती सोबत घेऊन बाटला हाउस मधील त्या फ्लॅटवर छापा मारला. की ज्या ठिकाणी दहशतवादी लपलेले होते, त्या वेळेला सकाळचे जवळजवळ साडेदहा वाजले होते दहशतवादी त्या बिल्डींगच्या दुसऱ्या मजल्यावर लपल्याची सूचना होती. पोलिसांच्या छाप्याची चाहूल दहशतवाद्यांना लागली. त्यानी तात्काळ दहशद माजवण्यासाठी आणि आणि लोकांमध्ये भय निर्माण करण्यासाठी तत्काळ फायरिंग सुरू कर केली. गोडी लागल्या कारणाने या टीमचे नेतृत्व करणारे इन्स्पेक्टर मोहन चंद शर्मा हेड कॉन्स्टेबल बलवंत सिंह आणि हे तिघेही या कारवाईमध्ये जखमी झाले पोलिसांबरोबर झालेल्या कारवाईत इंडियन मुजाहिदीन चा दहशतवादी आतिफ अमीन आणि मोहम्मद साजिद त्या ठिकाणी मारले गेले तर शहजाद अहमद आणि खान हे तिथून निसटून जाण्यात यशस्वी ठरले त्यानंतर अलावा मोहम्मद सईद आणि जीशान यांना कैद केले गेले नंतर शहजाद अहमद याला 1 फेब्रुवारी 2010 रोजी पोलिसांनी उत्तर प्रदेशातील आजमगड जिल्ह्यात कैद केले.

### दिल्लीतील बाटला हाऊस एन्काऊंटर संदर्भातील विवाद:-

दिल्लीतील जामिया नगर या ठिकाणी 19 सप्टेंबर 2008 रोजी झालेल्या एन्काऊंटर नंतर या परिसरातील दहशतवाद्यांचे समर्थक येथील कारवाईला फर्जी कारवाई सांगत या कहाणीला प्रचारित करण्याचा प्रयत्न करत होते. यासंदर्भात असे आरोप लावले गेले की, या कारवाईत निरपराध तरुणांची हत्या केली गेली. त्याच प्रमाणे पोलिसांमधील आपसातील भांडणामुळे इन्स्पेक्टर मोहनचंद शर्मा यांची देखील त्यांच्याच सहकाऱ्यांनी हत्या केली. असे प्रसारित करण्याचा प्रयत्न केला एवढेच नाही तर एन्काऊंटर च्या नंतर दहशतवाद्याना मदत करणाऱ्या लोकांना कैद करणे सुरू केले तर तेथील स्थानीय नेत्यांनी आणि काही सरकारी संघटनांनी या गोष्टीचा विरोध देखील केला. 20 सप्टेंबर 2008 आणि नंतर 24 ऑक्टोबर 2008 रोजी दिल्लीतील जामिया मिलिया विद्यापीठातील शिक्षक आणि विद्यार्थी यांचा एक गट एन्काऊंटर झालेल्या या केस बाबत उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी घेऊन दिल्लीतील रस्त्यावर उतरले स्वार्थी नेत्यांनी आणि विवाद शोधणाऱ्या काही पत्रकारांनी या केसला लवकरच राष्ट्रीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न केला. काही वर्तमानपत्रांनी जामिया नगर एन्काऊंटर केसला वाढवून वाढवून सांगण्याचा प्रयत्न केला. काही न्यूज चॅनल च्या लोकांनी देखील अर्ध आणि अपुऱ्या तथ्यांसह वेगवेगळ्या चर्चा घडवून आणल्या दोन मुख्य राजनीतिक पक्षांनी या एन्काऊंटर ला संसदेत मांडले आणि एन्काऊंटर ची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली.

'नाऊ फोर हार्मनी अंड डेमोक्रसी' नावाच्या गैर सरकारी संघटनेने दिल्ली हायकोर्टात या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी एक याचिका दाखल केली. परंतु 21 मे रोजी दिल्ली हायकोर्टाने राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला दोन महिन्यांमध्ये पूर्ण घटनेची चौकशी करून रिपोर्ट देण्याचे सांगितले.

### बाटला हाऊस एन्काऊंटर शी जोडलेल्या काही महत्वपूर्ण बाबी:-

1) 22 जुलै2009 रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने आपल्या 30 पानांच्या रिपोर्ट दिल्ली हायकोर्टाच्या समक्ष सादर केले. या रिपोर्ट मध्ये एन्काऊंटर चा दावा खरा आहे असे सांगून दिल्ली पोलिसांना क्लीनचिट दिली गेली. मानव अधिकार आयोग ने इंस्पेक्टर मोहनचंद शर्मा यांचा झालेल्या मृत्यू संदर्भात जी एक बनावट स्टोरी बनवली गेली होती त्या स्टोरी ला पूर्णपणे नाकारण्यात आले.

2)ऑगस्ट 2009 मध्ये दिल्ली हायकोर्टाने मानवाधिकार आयोगाच्या चौकशी अहवालाला स्वीकार करून त्याच बरोबर दिल्ली एन्काऊंटर ची न्यायिक चौकशी करण्याबाबत ज्या विविध याचिका दाखल करण्यात आलेल्या होत्या त्या सर्व याचिका बरखास्त केल्या गेल्या.

3) बाटला हाऊस एन्काऊंटर ला दोन वर्ष पूर्ण झाल्यानंतर 19 सप्टेंबर 2010 रोजी दिल्लीतील जामा मस्जिद परिसरात मोटर सायकलवर स्वार झालेल्या दहशतवाद्यांनी विदेशी पर्यटकांनी भरलेल्या एका बसवर फायरिंग केली त्यात दोन ताईवाणी पर्यटक घायाळ झाले पोलीस चौकशीनंतर एका कारमध्ये ठेवलेला कुकर बॉम्ब देखील पोलिसांना या वेळी मिळून आला त्या कुकर बॉम्ब मध्ये टाइम सेट केला गेलेला होता आणि तो वेळ जो वेळ बाटला हाऊस एन्काऊंटरवर हल्ला करण्याचा चा वेळ होता तोच वेळ सेट करण्यात आलेला होता.

4)दिल्लीतील टुरिस्ट बसवर ज्यादिवशी हल्ला करण्यात आला त्याच दिवशी ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन म्हणजेच बीबीसी आणि मुंबई याठिकाणी पाठवल्या गेलेल्या ईमेलमध्ये असा दावा केला गेला की, हा हल्ला बाटला हाऊस एन्काऊंटर चा बदला घेण्यासाठी केला गेला. असे ह्या ईमेल मध्ये सांगितले गेले एवढेच नाही तर दिल्लीतील जे दहशतवादी त्यात आतिफ अमीन आणि मोहम्मद साजिद यांना शहीद म्हटले गेले होते हे दोन्ही दिल्ली पोलिसांन बरोबर झालेल्या चकमकीत मारले गेले.

5)25 जुलै 2013 रोजी दिल्लीतील साकेत सेशन कोर्टाने बाटला हाऊस एन्काऊंटर नंतर फरार झालेल्या आणि नंतर उत्तर प्रदेशातील आजमगड येथे पकडल्या गेलेल्या शहजाद अहमद याला इन्स्पेक्टर मोहनचंद शर्मा यांच्या व हेड कॉन्स्टेबल बलवंत सिंह आणि राजवीर सिंह यांच्या हत्येच्या बाबतीत दोषी ठरवले गेले या ठिकाणी महत्त्वपूर्ण गोष्ट ही आहे की पोलिसांच्या टीमवर जो हल्ला केला तो हल्ला आतिफ अमीन मोहम्मद साजिद आणि शहजाद अहमद त्याचप्रमाणे आलीच खान या सर्वांनी मिळून केला होता.

6) पोलीस तपासात असे समोर आले की बाटला हाऊस एन्काऊंटर मध्ये मारला गेलेला आतिफ आमीन हा इंडियन मुजाहिदीन या संघटनेसाठी बॉम्ब बनवणाऱ्या मध्ये सर्वात महत्त्वपूर्ण व्यक्ती होता दिल्लीत 2008 मध्ये जे सिरीयल बॉम्ब स्पोट झाले त्याच्याआधी आमदाबाद जयपूर सुरत आणि फैजाबाद याठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटांमध्ये देखील त्याची महत्त्वपूर्ण भूमिका होती.

7) उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे सन 2010 मध्ये बॉं स्पोट झाल्यानंतर मुंबई पोलिसांनी असा खुलासा केला की पाकिस्तानातील इंडियन मुजाहिदीन या दहशतवादी गटाचा दहशतवादी इक्बाल भटकल आणि रियाज भटकळ यांनी वाराणसी मध्ये बॉम्बस्फोटांची योजना बनवली होती. या योजनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी डॉक्टर शहनवाज याने बाटला हाऊस एन्काऊंटर नंतर कैद केले गेलेल्या मोहम्मद सईद याचा तो भाऊ असल्याचे सिद्ध झाले पोलिसांच्या म्हणण्यानुसार बाटला हाऊस एन्काऊंटर नंतर डॉक्टर शहनवाज आपल्या सहकारी खालील अबू राशिद आणि साजीत यांच्याबरोबर नेपाळमध्ये पळून गेला या चारही लोकांनी तेथे नेपाळी पासपोर्ट देखील बनवून घेतला होता.

8) 2013 मध्ये इंडियन मुजाहिदीनचा एक दहशतवादी यासिन भटकल भारत नेपाळ बॉर्डरवर त्याला कैद केले गेले सुरक्षा एजन्सीच्या चौकशीत असा खुलासा झाला कि, बाटला हाऊस मध्ये जे एन्काऊंटर झाले त्या एन्काऊंटर च्या काहीकाळ आधी पर्यंत यासीन देखील त्या ठिकाणी हजर होता.

कोर्टाच्या आदेश मानव अधिकार आयोगाच्या चौकशी आणि इतर सर्व पुरावे समोर ठेवल्यानंतर हे पूर्णपणे स्पष्ट झाले की बाटला हाउस मध्ये इंडियन मुजाहिदीनच्या दहशतवाद्यांची पोलिसांबरोबर चकमक झाली होती अशा या दहशतवाद्यांचा सफाया करून दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने केवळ राजधानी नाही तर पूर्ण देशाच्या सुरक्षे साठी आपले बलिदान दिले होते. जनतेच्या मनात असलेला धाक कमी करण्यासाठी त्यांनी स्वतःच्या प्राणाची आहुती दिली होती की आज पर्यंत दहशतवादी कुठेही हल्ला करून पसार होतात ते सापडत नाहीत अशा प्रकारची एक धारणा लोकांच्या मनामध्ये निर्माण झालेली होती ती धारणा या बाटला हाऊस मधील कारवाईनंतर पोलिसांनी फोल ठरवलेली दिसून येते.

### 3) इशरत जहा एन्काऊंटर केस (2004):-

मुंबई जवळील ठाणे जिल्ह्यातील रहिवासी असलेली इशरत जहा एन्काऊंटर खटला अनेक दिवस मीडियामध्ये, वर्तमानपत्रांमध्ये वेगवेगळ्या गोष्टींनी गाजत राहिला 15 जून 2004 रोजी गुजरात पोलिसांनी व त्यांच्या एक स्पेशल टीमने तत्कालीन डीआयजी बंजारा यांच्या नेतृत्वात जावेद गुलाम, शेख अमजद अली राणा, जीशान जोहर आणि इशरत जहा यांना आमदाबाद मध्ये एका चकमकीत ठार मारण्याचा दावा केला. गुजरात पोलिसांच्या म्हणण्यानुसार दहशतवादी संघटन लष्कर-ए-तोयबा ने या चारही लोकांना गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी आणि बीजेपी नेता लाल कृष्ण आडवाणी यांच्या हत्या घडवून आणण्यासाठी पाठवलेले होते. यात जावेद गुलाब शेख हा मूळचा केरळचा रहाणारा होता. नंतर तो महाराष्ट्रात शिफ्ट झाला. तर अमजत आली राणा आणि जीशान जोहर हे पाकिस्तानी नागरिक असल्याचे सांगितले गेले परंतु लवकरच गुजरात पोलिसांच्या या दाव्यावर प्रश्न चिन्ह लावले गेले आणि या एन्काऊंटर ला देखील फर्जी एन्काउंटर असल्याचे मीडियामध्ये चालवले गेले इशरत जहा इला पोलिसांच्या आततायीपणा ची शिकार झाल्याचे तसेच ती निरपराध मुस्लिम युती होती,आणि ज्या पद्धतीने तसा प्रसार केला. गेला ज्याप्रकारे आपण वरील काही खटले पाहिले. १९९३ मधील मुंबईतील बॉम्ब स्फोट असो किंवा दिल्लीतील बाटला हाऊस एन्काऊंटर असो याठिकाणी अशा काही लोकांनी वास्तविकता बाजूला सारून त्याचा प्रचार वारंवार करून ते लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला काहीसे तसेच याच्या संदर्भामध्ये सुद्धा घडलेल् आपल्याला दिसते. त्यातून देशातील काही लोकांनी दहशतवादाची बाजू घेऊन त्यांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळेस इशरत जहा चा अंतिम संस्कार करण्यात आला त्यावेळेला दहा हजार लोकांची गर्दी त्या ठिकाणी उपस्थित होती. यावरून असे सिद्ध होते की देशातील अनेक लोक या दहशतवाद्यांना हुतात्मा किंवा निरपराध असल्याचे प्रमाणपत्र सतत वाटतंना दिसतात. इशरत जहा च्या संदर्भात मीडियामध्ये आणि तिच्या नातेवाईकांकडून अनेक वर्ष बेकसूर असल्याची चर्चा अनेक वर्ष सुरू राहिली. 15 जून 2004 रोजी झालेले हे एन्काऊंटर होते होते किती खरे होते या पासून बाजूला होऊन तटस्थपणे काही गोष्टीवर लक्ष देण्याची गरज आहे.

1) जून 2004 मध्ये लाहोरमध्ये छापल्या गेलेल्या दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा च्या मुख पत्रात ज्याला आपण ‘गजवा टाइम्स’ म्हणून ओळखतो या वर्तमानपत्राने आहमदाबाद मध्ये झालेले एन्काऊंटर नंतर हा दावा केला की इशरत जहाचे तार लष्कर बरोबर जुळलेले होते आणि एन्काऊंटर च्या वेळी ती आपल्या पतीबरोबर होती. गजवा टाइम्स ची वेबसाईटने लिहिले की इशरत जहा लष्कराची महिला होती त्याचप्रमाणे तिचे शव दुसऱ्या मुजाहिदीन जवळ ठेवले गेले होते. नंतर यासंदर्भात पाकिस्तानची फजिती होतांना दिसल्यावर प्रकारच्या पॉलिटिकल विंग जमात-उद-डावाने गजवा Times मध्ये छापलेली बातमी जर्णलिस्तिक मिस्टेक असल्याचे सांगून त्यांनी खेद व्यक्त केला.
2) जून 2013 मध्ये भारतातील एक प्रतिष्ठित मॅगझीन त्याने दावा केला की, इंटेलिजन्स ब्युरो आयबी तत्कालीन प्रमुख आसिफ इब्राहिम, पंतप्रधान कार्यालय आणि गृह मंत्री यांना हे सांगितले की, आयबी च्या जवळ या गोष्टीचे पूर्ण पुरावे आहेत की इशरत जहा लष्कर-ए-तोयबा साठी काम करत होती. आणि मोदी व अडवाणी यांना मारण्यासाठी लष्कर कडून बनवल्या गेलेल्या फिदाइन गटाची ती सदस्य होती. इब्राहिमने असेही सांगितले की, अमेरिकी गुप्तचर एजन्सी यफ बी आय च्या चौकशीत मे 26/11 मुंबई तील हल्ल्याचे साजिश करते त्यातील एक डेव्हिड कोलमन हेडली यांनी सांगितले की,इशरत एक महिला आत्मघाती हल्ला करणारी होती. तिला भारतात एक मोठ्या मिशन साठी पाठवण्यात आलेले होते. फेब्रुवारी 2016 रोजी हेडली याने मुंबईच्या न्यायालयाला जी साक्षी दिली त्या साक्षीत इशरत जहा ही लष्कराची सदस्य असल्याची पुष्टी केली.

3) इशरत जहा च्या कुटुंबाकडून अशी माहिती मिळाली की ती जावेद गुलाम शेख याच्या साठी काम करत होती. जावेद गुलाम बरोबर ती नेहमी शहरात इकडेतिकडे जात होती. इशरत जहा चे जावेद गुलाम यांच्याबरोबर जाणे तिच्या आईला पसंत देखील नव्हते त्यामुळे 11 जून 2004 रोजी जेव्हा ती घरातून बाहेर पडली त्या बाबतीत तिच्या आईने काहीही सांगितले नाही नंतर नाशिक हुन तिने आपल्या आईला केवळ एवढेच सांगितले की जावेद बरोबर आहे. याठिकाणी एक गोष्ट लक्षात येते की इशरत जहा कडे अशा अनेक गोष्टी असतील की, त्या गोष्टी तिने आपल्या घरी किंवा परिवाराला सांगितलेल्या नसतील.

4) इशरत जहा ही नेहमीच जावेद गुलाम शेख नावाच्या व्यक्ती बरोबर वेगवेगळ्या शहरांच्या दौऱ्यावर जात होती. तिच्याविरुद्ध फेक करन्सी मध्ये तिचा सहभाग असल्याचे देखील तिच्यावर आरोप झाले होते. त्या व्यतिरिक्त तिच्यावर इतर चार अपराधिक खटले सुरू होते. चौकशी एजन्सी जवळ या गोष्टीचे देखील पुरावे होते की, जावेद लष्कर-ए-तय्यबा चा दहशतवादी मुजम्मिल भट याच्याबरोबर सतत संपर्कात होता. पाकिस्तान मधील 'गजवा टाइम्स' द्वारा दिल्या गेलेल्या माहितीला दुर्लक्षित करून असाही प्रश्न निर्माण होतो की, इशरत जहा अशा व्यक्तीबरोबर का फिरत होती. असे कोणते महत्त्वपूर्ण काम होते की ज्या कामांना पूर्ण करण्यासाठी इशरत जहा घर वाल्यांचा विरोधात जाऊन देखील जावेद बरोबर एक दुसऱ्या शहरांमध्ये जात होती?

5) इश्रत जहान एन्काऊंटर मध्ये मारला गेलेला अमजद अली राणा उर्फ अकबर उर्फ सलीम हा पाकिस्तानी नागरिक होता. चौकशी करणाऱ्या एजन्सी नुसार तो आहमदाबाद मध्ये दहशतवादी हल्ला करण्यासाठीच गुजरात मध्ये आलेला होता. असे सांगितले जाते की, अमजद अली जावेद याला तो ओमान या देशात अनेक वेळा भेटलेला देखील होता. त्याचबरोबर जावेद आणि इशरत इब्राहिमपुर मध्ये देखील त्याला एकदा भेटली होती. चौथा दहशतवादी जीशान जोहर याला जावेद आणि इशरत यांची भेट देखील अमजद अली यांनी घडवून आणली होती.

6) या केस मध्ये मारला गेलेला चौथा संदिग्ध जीशान जोहर उर्फ अब्दुल राणा याच्याजवळ पाकिस्तानी ओळखपत्र मिळाले त्याच्या आधारावर गुजरात पोलिसांनी असा दावा केला की, तो पाकिस्तानी नागरिक होता. परंतु सुरुवातीला मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट एस.पी. तमांग यांनी जो रिपोर्ट सादर केला होता त्या रिपोर्टमध्ये हे दोन्ही भारतीय असल्याचे म्हटले होते. परंतु तमांग यांच्या तर्कावर त्यांनी कुठल्याही प्रकारचे पुरावे सादर केलेले नव्हते.

वरील प्रकारची सर्व परिस्थिती पाहता आपल्याला असे लक्षात येते की भारतामध्ये दोन गट निर्माण झालेले आहेत एक गट राष्ट्रवादी लोकांचा आहे. तर दुसरा गट हा अँटी नॅशनल आहे अँटी नॅशनल गट यात अनेक मूलतत्त्ववादी आहेत. काही मोठ्या पक्षांचे लोक त्याच बरोबर काही विदेशी विचारधारेवर प्रेम करणारे लोकांचा यात समावेश असलेला आपल्याला दिसतो. देशात घडत असलेल्या अनेक घटनांवरून दिसून येत आहे भारताने अनेक वर्षांच्या महत्तम अशा संघर्षानंतर 1947 ला स्वातंत्र्य मिळविले आहे. परंतु आज देशामध्ये अनेक राजकीय पक्षांचे नेते अनेक उच्च विद्याविभूषित अनेक जातिधर्मातील काही मूठभर लोक हे एवढे सत्तांध आणि मदांध झालेले आहेत की त्यांना आपल्या खुर्चीसाठी आपल्या वैभव नावासाठी ते ज्या देशाचे हवा ग्रहण, करतात ज्या देशाचे अन्न खातात, ज्या देशात पैसा कमवतात सुख-सुविधा उपभोगतात अशा या देशाविरुद्ध असे लोक देश विरोधक काम करताना दिसतात. गेल्या काही वर्षांमध्ये आपला चीनबरोबरचा संघर्ष असो पाकिस्तान बरोबरचा संघर्ष असो किंवा आपल्या इतर शेजारी राष्ट्रांबरोबर चा संघर्ष असो प्रत्येक संघर्ष वेळी या लोकांनी आपल्या शत्रूला कसा जास्त फायदा होईल, त्यांना आपली बाजू आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडण्यासाठी कसा फायदा होईल यासाठी असे लोकं आपली बरड ओकताना दिसतात. 2019 मध्ये भारत सरकारने काश्मीरच्या संदर्भात घेतलेला निर्णय असो 2020 मधील गलवान खोऱ्यातील भारत चीन चा संघर्ष असो किंवा पठाणकोट एयर बेस वरील हल्ला असो किंवा भारताने दोन वेळा पाकिस्तानात केलेले सर्जिकल स्ट्राइक असो किंवा

म्यानमार मध्ये केलेले सर्जिकल स्ट्राइक असो या भारतीय सेना किंवा भारतीय सरकारने या सगळ्या प्रश्नांच्या संदर्भात जी एक कठोर भूमिका सतत घेतलेले आहे. अनेक भारतीय लोक याच्या विरोधात काम करताना दिसतात अश्या या चुकीच्या लोकांमुळे देश विरोधी लोकांमुळे आज भारतामध्ये सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने अस्थिरता दिसत आहे. किसान आंदोलन असो covid-19 असो बंगाल मधील निवडणुका आसाम मधील एन आर सी असो एखाद्या देशाशी झालेला आपला संरक्षण करार असो किंवा संरक्षण संबंधी खरेदी असो या सर्व बाबतीत भारतातील एक असा देश विरोधी गट आहे की, तो सतत प्रत्येक गोष्टीवर सरकारच्या विरोधात उभा राहून सरकारलाच सतत दोष देत असतो. आणि सतत लोकांमध्ये एक भ्रमाची स्थिती निर्माण करण्याचा या लोकांचा प्रयत्न असतो.

अशा या लोकांमुळे राष्ट्रातील लोकांमध्ये आपापसात छोट्या-मोठ्या कारणाने वैमनस्य निर्माण होते अक्षरशः दिल्लीतीळ श्राइन बाग किंवा दिल्ली बॉर्डर वरील शेतकरी आंदोलन असो या सर्व गोष्टींमध्ये लोकांना भ्रमित आणि सत्यापासून वेगळे करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. या सर्व गोष्टी जर सतत अशा चालत राहिल्या तर देशापुढे अंतर्गत आणि बहिर्गत अशा दोन्ही सुरक्षा समस्या एकाच वेळेला निर्माण होतील आणि या दोन्ही आघाड्यांवर भारत सरकारला भारतीय लष्कराला लढणे अशक्य होईल. भारतीय लोकशाहीचे जे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत या आधारस्तंभला देखील सतत कमकुवत करण्याचा केविलवाणा प्रयत्न आज भारतात सतत सुरू आहे. हे करण्यामागे अंतिम उद्देश फक्त सत्ता प्राप्ती एवढाच मात्र आहे. सत्तेसाठी लोकांची, राजकीय पक्षातील लोकांची आणि राजकीय पक्षांची सतत निष्ठा बदलताना दिसत आहे. आज सत्तेसाठी कोणताही पक्ष कोणत्याही दुसऱ्या पक्षाचे हात हात घालून सत्तेत भागीदार बनून आपले हित साध्य करण्याच्या प्रयत्नात लागलेला आहे. हे अशा प्रकारचे पक्ष अशा प्रकारचे लोक हे राष्ट्र वादापासून कोसो दूर आहेत. अशा लोकांच्या हातात देशाची सत्ता जर असली तर आपल्याला प्राप्त केलेलं आपलं वैभव हे केव्हा आपल्या हातून निघेल हे सांगता येणार नाही.

आज लोकशाहीचा जो चतुर्थ स्तंभ आपण म्हणतो तो म्हणजे मीडिया मीडियाने जर ठरवले तर तो देशासाठी कुठलंही चांगलं करू शकतो तेवढी क्षमता आजच्या मिडियामध्ये निश्चितच आहे. परंतु दुर्दैवाने आजचा मेडिया देखील विकाऊ झाला आहे, पेड न्यूज पसरवणारा असेल, टीआरपी वाढावा यासाठीच बातम्या प्रसारित करणारा असेल, तर मात्र देशासाठी कैवारी सापडणे कठीण होईल. म्हणून लोकशाहीच्या चारही स्तंभांची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. त्याच बरोबर देशातील नागरिकांनी सुद्धा देशाच्या हितासाठी देशद्रोही लोकांच्या नादी न लागता चांगले वाईट या गोष्टी आपल्या विवेकाच्या कसोटीवर घासून शेवटी त्यातून जे सत्य असेल ते त्याचा स्वीकार केला पाहिजे आणि सत्याच्या बाजूने देशासाठी उभे राहिले पाहिजे. जर आपण आपसातच विविध कारणांनी भांडत राहिलो मीडियाने टीआरपी साठी प्रसारण तंत्राचा वापर करीत राहिला तर मात्र आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी जे एक चांगले चित्र रंगवले होते तसे घडणार नाही. पर्यायाने त्यांच्या बलिदानाला न्याय मिळणार नाही. म्हणून शेवटी असे म्हणता येईल की, भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशातील विविध ते मध्येच आपली खरी शक्ती देखील आहे. परंतु आपल्या शुल्लक स्वार्थासाठी आज लोकं वेगवेगळे मार्ग अनुसरता नाअसताना दिसतात. आणि ही खरी चिंतेची बाब आहे अशाने आपल्याला आपली राष्ट्रीय सुरक्षा राखणे राष्ट्रीय संरक्षण करणे निश्चितच अवघड होईल म्हणून देशातील सर्व राजकीय पक्षांनी मीडियाने सामान्य जनतेने आप आपसा मध्ये वैरभाव निर्माण होणार नाही, आपल्या देशातील दुहीचा फायदा आपले शत्रू, आपले शेजारी उचलणार नाहीत याची काळजी आपण सर्वांनी घेणे ही काळाची गरज आहे अन्यथा आपले पारतंत्र्य फार दूर आहे असे म्हणता येणार नाही.

संदर्भसूची:-

१) भारत आणि दक्षिण आशय राष्ट्रांमधील संबंध- डॉ.  बी.डी. तोडकर

२) भारत आणि भारताचे शेजारी- संपादक: मनीष टिकेकर, साधना प्रकाशन पुणे

३)  वीरेंद्र प्रकाश शर्मा (1999) भारत में सामाजिक परिवर्तन, पंचशील प्रकाशन जयपुर, प्रथम संस्करण

४) भांडारकर/ शब्बीर/ पालकर( 1987), भारतीय सामाजिक समस्या, एस चंद्र अँड कंपनी प्रा. लि. रामनगर, नवी दिल्ली

५)चावरे दिलीप व इतर( 2011), महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव- शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चरणी रोड, मुंबई, 18 ऑक्टोबर

६)  Crime and criminology- socio- legal analysis of the the phenomenon of crime , Robinton Mehta, Snow White Publication PVT. Ltd. Mumbai

7) new dimension of Justice- J.S. Verma- universal law Publication company Pvt Limited.

8) law and Society- justice M N Rao

9) Global anti terrorism law and policy- R.N. Verma- Navyug, books International, New Delhi